# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २९, १९३९ ( शके )**

**(१) आदिवासी विकास मंत्री**
**(२) उद्योग व खनिकर्म मंत्री**
**(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
**(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**
**(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६१**

---

### नाशवंत शेतमालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळण्याकरिता गठीत केलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(१) * ९६३८३ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशवंत शेतमालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळण्याच्यादृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी गठीत केलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) शासन निर्णय, दिनांक २४/४/२०१७ अन्वये नाशवंत शेतमालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळण्याच्यादृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या सदस्यांनी राज्याच्या विविध भागांमध्ये बैठका घेण्याच्या सूचना केल्यानुसार पुणे, नाशिक, वर्धा व सोलापूर येथे एकूण ५ बैठका घेण्यात आल्या आहेत. सदर बैठकांमध्ये झालेल्या चर्चा तसेच विविध प्रतिनिधींकडून प्राप्त सूचना आणि गठीत समितीच्या शिफारशीसह सविस्तर अहवाल तयार करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत व पेण (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळांच्या समस्यांबाबत

**(२) * ९७६१७ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यात शासनाने सहा आदिवासी आश्रमशाळा उभारण्याचा निर्णय घेतला मात्र तेथे स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नसल्याबाबतच्या तक्रारी कर्जत तालुका आदिवासी संघटनेने तसेच पालकांनी विभागीय प्रकल्प अधिकारी, पेण (जि.रायगड) यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच पेण तालुक्यातील आदिवासी वसतिगृहात ३५ विद्यार्थी शिकत असून या विद्यार्थ्यांना मेसमध्ये शिळे अन्न दिले जात असल्याचेही दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या समस्यांबाबत तसेच वसतिगृहाच्या दुरवस्थेबाबत येथील विद्यार्थांनी प्रकल्प अधिकारी, पेण यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्नाधीन तक्रारींची शासनाने दखल घेतली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारणाऱ्या प्रशासनाची व शिळे अन्न पुरविणाऱ्या ठेकेदाराची चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त समस्यांच्या निराकरणासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) पेण प्रकल्पांतर्गत असलेली शासकीय आश्रमशाळा कळंब, ता.कर्जत, जि.रायगड ही शाळा भाडयाच्या व गैरसोयीच्या इमारतीत असल्यामुळे तसेच याशाळेत विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे ही शाळा नजीकच्या शाळेत समायोजित करण्यात आली आहे. सदर आश्रमशाळा बंद केल्यामुळे स्थानिक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतील म्हणून दोन संघटनानी सदर आश्रमशाळा बंद करू नये म्हणून प्रकल्प कार्यालयाकडे निवेदन दिले होते. परंतु कर्जत तालुक्यातील इतर ४ आश्रमशाळांमध्ये कळंब आश्रमशाळेतील ८० विद्यार्थ्यांना व सर्व स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे स्थानिक एकही विद्यार्थी शालेय प्रवेशापासून वंचित राहिलेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयातील कापडणे उपकेंद्रांतर्गत असलेले रोहित्र बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(३) * ९९४७७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणने धुळे जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१७ पासून थकीत असलेल्या वीज देयकांमुळे कापडणे उपकेंद्रांतर्गत असलेले रोहित्र बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच घरगुती वीज ग्राहकांच्या थकीत असलेल्या वीज देयकांमुळे त्यांची वीज जोडणीही खंडीत करण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार रोहित्र बंद न करण्याबाबत तसेच थकीत देयके वसुल करताना वीज जोडण्या खंडित न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा थकबाकीपोटी खंडीत करण्यात आला होता. थकीत वीज बीलापोटी २३ घरगुती वीज ग्राहकांचा वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात आला आहे. तसेच ६ घरगुती वीज ग्राहकांचा वीज पुरवठा कायम स्वरुपात खंडीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयातील नाफेड केंद्रावर तुर विक्रीमध्ये झालेला गैरप्रकार

**(४) * ९७४०० डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील नाफेड केंद्रावर बनावट नावाने तुर विक्री करणाऱ्या ४९ शेतकऱ्यांसह ९ व्यापाऱ्यांवर स्थानिक पोलिस स्टेशन येथे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात बनावट नावाने इतर जिल्हयातील तुर विक्री करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट नावाने तुर विक्री करणाऱ्या शेतकरी व व्यापाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

पोलीस स्टेशन चंदनझिरा ता.जालना येथे दिनांक १/९/२०१७ रोजी ४९ शेतकरी, १९ व्यापारी व इतर २ व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी जालना यांचे आदेशानुसार पोलीस खात्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन चंदनझिरा, ता.जालना येथे गुन्हा दाखल क्र. २२७/२०१७, दिनांक १.९.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास पोलीसांमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाला दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर झालेला निधी वितरित न झाल्याबाबत

**(५) * १०२६८० डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाला शासनाकडून दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता २४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी मंजूर होऊन चार महिन्यांचा कालावधी झालेला असतानाही मंजूर निधीचे तालुकानिहाय वितरण अद्याप झाले नसल्यामुळे विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर असलेला निधी तालुकानिहाय वितरित न करण्याची कारणे काय आहेत व सदरहू निधी तात्काळ वितरित करुन विकास कामांना चालना देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) व (३) जिल्हा परिषद, समाजकल्याण समितीच्या मान्यतेने नियोजन करुन तालुका निहाय निधी वितरण करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद परभणी स्तरावर चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महानिर्मिती, महावितरण व महापारेषण या तीनही वीज कंपन्यांच्या कर्जासाठी शासनाने हमी देण्याबाबत

**(६) * ९५३९१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कर्जासाठी हमी दिली नसल्याने महानिर्मिती, महावितरण व महापारेषण या तीनही शासकीय वीज कंपन्यांच्या कर्जावर जादा व्याज दराचा भार येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उर्जा विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीच्या लेखा अहवालानुसार महानिर्मिती, महावितरण व महापारेषण या तीनही कंपन्यांवर सुमारे ६३ हजार ३८४ कोटी रुपये कर्जाचा भार असून त्याचा सरासरी व्याजदर ९.९८ टक्के इतका आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या तीनही कंपन्यांच्या कर्जाला हमी दिल्यास दोन टक्के व्याजदर कमी करण्याची वित्तीय संस्थांची तयारी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने कर्जाला हमी दिल्यास प्रतिवर्षी दोन हजार कोटींची बचत होऊन वीज ग्राहकांनाही वीज दरात सवलत देता येणे शक्य असल्याने तीनही कंपन्यांच्या कर्जाला हमी देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही, तथापि कंपनीच्या कर्जाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

१. दिनांक ३१/०३/२०१७ रोजी महानिर्मिती कंपनीचे एकूण अदत्त कर्ज रु.३५,३१० कोटी असून त्याचा सरासरी व्याज दर १०.१६ % एवढा आहे.

२. दिनांक ३१/०३/२०१७ रोजी महावितरण कंपनीचे लघु, मध्यम व दीर्घ मुदतीच्या अदत्त कर्जाची रक्कम रु. २३,१७२ कोटी इतकी होती व त्याचा सरासरी व्याज दर हा १०.५४% इतका आहे.

३. दि.३१/०३/२०१७ रोजी महापारेषण कंपनीच्या दिर्घमुदतीच्या कर्जाची अदत्त रक्कम रु.६,७३३ कोटी असून त्याचा सरासरी व्याज दर १०.६०% इतका आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ व मराठवाड्यातील कृषी पंपाचा अनुशेष दूर करण्याबाबत

**(७) * १०२९५५ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाडयातील कृषी पंपाचा अनुशेष दूर करण्यासाठी गत वर्षात सुमारे ८० हजार ७२९ नवीन वीज जोडण्या देण्याचा निर्णय शासनाने घेतला असला तरी अद्यापि त्याची अंमलबजावणी केली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार प्रलंबित वीज जोडण्यांचा अनुशेष दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) विदर्भ व मराठवाडयामध्ये मार्च २०१६ अखेर ८६,८७० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१६-१७ मध्ये विविध योजनाअंतर्गत विदर्भ व मराठवाडयामध्ये ७१,९४४ कृषी पंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे.

(२) व (३) मार्च २०१७ अखेर १,०३,५६१ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित अर्जांपैकी सन २०१७-१८ मध्ये ऑक्टोबर, २०१७ अखेर विविध योजनाअंतर्गत २६३५६ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कृषीपंप वीज जोडणीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच विदर्भ व मराठवाडयातील कृषीपंप वीज जोडणीसाठी शासनाने विशेष योजना मंजूर केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी पंप वीज देयकांची थकबाकी वाढल्याने शेतकऱ्यांची वीज जोडणी खंडित करण्यात येत असल्याबाबत

**(८) * ९६९६८ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी पंप वीज देयकांची थकबाकी वाढल्याने राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या थकीत वीज देयकांपैकी चालू देयके भरण्याची सक्ती करण्यात येवून सात दिवसात वीज देयकांची रक्कम न भरल्यास त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल असा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत शेतकऱ्यांना वीज देयके भरणे शक्य नसल्याने त्यांनी चालू वीज देयके न भरल्यास थकबाकीदार शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येऊ नये अशी मागणी सदर शेतकऱ्यांनी मा.उर्जा मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अचलपूर (जि.अमरावती) येथील महावितरणचे कार्यकारी अभियंता यांनी कृषि पंपाचे वीज देयक भरल्याशिवाय नविन डीपी मिळणार नाही असाही निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, थकीत वीज देयके भरण्याची सक्ती न करण्याबाबत तसेच थकबाकी वसुली करताना वीज जोडणी खंडित न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) राज्यात सुमारे ४०.८२ लाख कृषीपंप ग्राहक असून त्यापैकी ३७.६४ लाख ग्राहकांकडे ऑक्टोबर, २०१७ अखेर रु.२१,९६९ कोटी (व्याज व दंड मिळून) एवढी थकबाकी आहे. कृषीपंप ग्राहकांकडून वीज बिल भरणा करण्याचे प्रमाण अत्यल्प (७.५%) असल्याने व थकबाकीची रक्कम वाढत असल्याने महावितरण कंपनीस आर्थिक तोटा सहन करुन वीज वितरणासाठी आवश्यक विद्युत पायाभूत सुविधांची कामे, नवीन वीज जोडणीची कामे, देखभाल-दुरुस्तीची कामे करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे सदर थकबाकीची वसुली करण्याशिवाय महावितरण कंपनीस पर्याय नाही. तथापि सदर थकबाकीची वसुली करतांना कृषी ग्राहकांकरिता व्याज व दंड व्याजाची रक्कम वगळून फक्त मूळ बिलाची रक्कम भरणे सोयीचे व्हावे याद्दष्टीने शासनाने शासन निर्णय दि.३१.१०.२०१७ अन्वये "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना, २०१७" जाहीर केली आहे. सुरुवातीस चालू कृषी वीज बिल देयके भरण्याची मुदत दि. ७ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत होती, परंतु नंतर सदर कालावधी दि. ३०/११/२०१७ पर्यंत वाढविण्यात आला होता.
(३) व (४) हे खरे आहे
दि. २६.१०.२०१७ रोजी कार्यकारी अभियंता, महावितरण, अचलपूर विभाग यांच्यातर्फे चालू वीज बिल भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता, परंतु दि. ३१.१०.२०१७ रोजी मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना जाहीर झाल्याने सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर येथील सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत

**(९) * १०३३४४ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील बालिकाश्रम रस्ता परिसरातील सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी डबा बंद आंदोलन करुन आयुक्त, समाजकल्याण विभाग यांना वारंवार निवेदन देऊनही त्यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वसतीगृहातील विदयार्थ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) दि.८.१०.२०१७ रोजी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाच्या दिवशी संबधित सहायक आयुक्त यांनी विद्यार्थ्यांची भेट घेऊन मुलांशी चर्चा केलेली आहे. तसेच विदयार्थ्यांच्या मागण्याही पुर्ण करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील सिन्नर व्यापारी सहकारी पतसंस्थेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१०) * ९५९५७ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील सिन्नर व्यापारी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळ व अधिकाऱ्यांनी संगनमत करुन सुमारे ४३ कोटी ४८ लाख ४९ हजार रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे लेखा परिक्षण अहवालावरुन माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय

आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, खरे आहे.

(२) श्री.अजय नंदलाल राठी, सनदी लेखापाल, नाशिक यांनी सदर पतसंस्थेचे दिनांक ०१.०४.२०१४ ते ३१.०३.२०१६ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण केले. सदर लेखापरिक्षणात पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ व कर्जदार सभासद हे रूपये ४३,४८,४१,८२२/- या रकमेस जबाबदार असल्याचे आढळून आलेले आहे. यास्तव सर्व जबाबदार व्यक्तींकडून रक्कम वसुल होणेसाठी या सर्वांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतची परवानगी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दि.०४.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे.

श्री.अजय राठी यांनी दिनांक ०४.०८.२०१७ रोजी सिन्नर पोलिस स्टेशन येथे सदर पतसंस्थेच्या संचालक मंडळ, पदाधिकारी, कर्जदार सभासद यांच्याविरूध्द फिर्याद दाखल केली असून सिन्नर पोलिस स्टेशन यांनी सदर व्यक्तींविरूध्द एकूण रूपये ४३,४८,४१,८२२/- इतक्या रकमेची फसवणूक केलेबाबत दिनांक २९.०८.२०१७ रोजी गुन्हा नं.१५०/२०१७ दाखल केलेला आहे.

सदर प्रकरणी पोलिस उपअधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण यांच्या मार्फत पुढील तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नानीवली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेतील अधिक्षकाने विद्यार्थ्याला केलेली मारहाण

**(११) * ९९१०३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नानीवली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासकीय आश्रमशाळेतील अधिक्षक नामदेव मुंडे यांनी मद्यप्राशन करुन इयत्ता नववीत शिकणाऱ्या एका आदिवासी विद्यार्थ्याला बेशुध्द होईपर्यंत मारहाण

केल्याची घटना दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अधिक्षकाने यापूर्वीही आकोली, किराट, बोरशेती येथील आश्रमशाळेतील मुलांना जबर मारहाण केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषी अधिक्षकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) नानीवली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेतील श्री. नामदेव मुंडे, प्राथमिक शिक्षक तथा प्रभारी अधिक्षक यांनी सदर आश्रमशाळेतील विद्यार्थी कु.निलेश मधुकर मातेरा या विद्यार्थ्यास अरेरावी व उध्दट वर्तन केल्याच्या कारणास्तव मारहाण केली होती.

सदर शिक्षकाने यापूर्वी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मारहाण केल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, ता. डहाणू, जि.पालघर यांचे स्तरावरून चौकशी समिती स्थापना करण्यात येऊन सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली. सदर चौकशीत श्री.नामदेव मुंडे, प्राथमिक शिक्षक तथा अधिक्षक हे दोषी आढळून आल्याने त्यांना “एक वेतनवाढ भावी वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशाप्रकारे एक वर्षाकरिता रोखून ठेवण्यात यावी” अशी शिक्षा देण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारणी (जि.अमरावती) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(१२) * ९६६३१ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी (जि.अमरावती) अंतर्गत येणाऱ्या २७ अनुदानित आश्रमशाळांना विविध योजनांमधुन प्राप्त होणारे अनुदान आदिवासी विकास विभागाकडून मागील दोन वर्षापासून प्राप्त झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,

हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुमारे ३० हजार विद्यार्थी शिकत असून आदिवासी विकास विभागाकडून अनुदान न मिळाल्यामुळे या आश्रमशाळांत विविध सोयी-सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीदरम्यान काय निदर्शनास आले, त्यानुसार आश्रमशाळांना वेळेवर अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अनुदानित आश्रमशाळा लवादा, गोडवाडी, परसापूर व गणेशपूर या चार अनुदानित आश्रमशाळा वगळता उर्वरित आश्रमशाळांचे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी जि.अमरावती अंतर्गत एकूण २७ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून सदर शाळांमध्ये एकूण ११,१८३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

त्यापैकी अनुदानित आश्रमशाळा लवादा, गोडवाडी, व गणेशपूर या आश्रमशाळेच्या व्यवस्थापनाने अभिलेखे सादर न केल्यामुळे सन २०१६-१७ चे अनुदान निर्धारण करण्यात आलेले नाही.

तसेच अनुदानित आश्रमशाळा परसापूर या शाळेतील विद्यार्थी शासकीय आश्रमशाळेत समायोजित करण्यात आले आहेत.

-----------------

## चोपडा (जि.जळगांव) येथील आदिवासी विद्यार्थ्यांनी काढलेल्या मोर्चाबाबत

**(१३) * ९६२७६ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) येथील ३०० विद्यार्थ्यांनी आदिवासी वसतिगृहाच्या प्रवेशाची मर्यादा वाढवावी या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी ४७ कि.मी.चे अंतर पायी चालत यावल येथील आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प कार्यालयावर माहे सप्टेंबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात मोर्चा काढला, हे खरे

आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू मागण्यांची पूर्तता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) प्रवेशापासून वंचीत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, अपात्र केलेल्या अर्जदारांना वसतीगृहात प्रवेश देणे, वसतीगृह प्रवेशाची क्षमता वाढविणे, वसतीगृहांस शासकीय जागा प्राप्त करून इमारत बांधकाम करणे, कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे, शिक्षणात खंड पडलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश देणे, मुलींच्या वसतीगृहातील गृहपालांची बदली करणे, वसतीगृहात टेबलखुर्ची, संगणक, पंखे, ट्युबलाईट उपलब्ध करून देणे, मुलींचा प्रलंबित निर्वाह भत्ता अदा करणे इत्यादी मागण्या होत्या.

(३) व (४) मोर्चातील विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

i. आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, चोपडा (नवीन व जुने) येथील प्रत्येकी ४० जागा तसेच आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, चोपडा येथील ५६ जागा वाढविण्यात आल्या आहेत.

ii. ऑनलाईन अर्ज करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना खास बाब म्हणून वसतीगृहात प्रवेशित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

iii. आदिवासी मुलांच्या नवीन व जुन्या वसतीगृहाकरिता चोपडा शहरातील शासकीय जमीन मिळण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे.

iv. वर्ग-३ संवर्गातील गृहपाल पदावर नियुक्ती देण्याबाबत अपर आयुक्त, नाशिक यांच्याकडून कार्यवाही सुरू आहे.

v. मुलींच्या वसतीगृहाच्या गृहपाल यांचा परिविक्षाधीन कालावधी १ वर्षाने वाढविण्यात आला असून त्यांच्या विरूद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.

vi. टेबलखुर्ची, संगणक, पंखे, ट्युबलाईट इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

vii. वसतीगृहातील मुलींचा माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंतचा निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला आहे.

-----------------

## धुळे जिल्हयातील वसतिगृहांना अनुदान मिळण्याबाबत

**(१४) * ९६१५६ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील जिल्हापरिषदेच्या कार्यक्षेत्रातील १०८ वसतिगृहांना गेल्या २ वर्षांपासून अनुदान देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच या वसतिगृहांकडे मुळ मान्यता दिल्याबाबतच्या आदेशांची स्थळप्रत जिल्हा परिषदेतील समाजकल्याण विभागाकडे उपलब्ध आहे किंवा कसे याबाबतची तपासणी संबंधित अधिकाऱ्यांनी केली आहे काय, असल्यास, केव्हा व त्यात काय आढळून आले आहे,

(३) तसेच या जिल्ह्यातील ज्या २५ अनुदानित वसतिगृहांकडे मुळ मान्यतेचे आदेश नाहीत अशा वसतिगृहांची जात पडताळणी करण्याबाबत आयुक्तांकडे पाठविलेल्या अहवालावर आयुक्तांनी अंतिम निर्णय घेतला आहे काय, सदरहू निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात किती अनुदानित वसतिगृहे कार्यरत आहेत व त्यातील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) धुळे जिल्हयातील १०८ अनुदानित वसतीगृहांपैकी ८३ वसतीगृहांचे मुळ मान्यता आदेश जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हापरिषद धुळे यांचेकडे उपलब्ध आहेत.

(३) मुळ मान्यता आदेश नसलेल्या वसतीगृहांची प्रादेशिक उप आयुक्त/उप

आयुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्यामार्फत तपासणी करण्यात आलेली आहे. यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

मा.राज्यमंत्री, सा.न्या. यांचे अध्यक्षतेखालील समितीव्दारे दि.९.११.२०१७ रोजी या वसतीगृहांची सुनावणी घेण्यात आली असून, समितीने अहवाल सादर केलेला आहे.

(४) समितीच्या अहवालास अनुसरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

धुळे जिल्हयात एकुण १०८ अनुदानित वसतीगृहे असुन, त्यामधील सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची प्रवेशित विदयार्थ्यांची संख्या ४७३७ इतकी आहे.

-----------------

## अकोला जिल्हयातील वखार महामंडळाच्या धान्य गोदामामध्ये धान्य साठ्याचा झालेला गैरव्यवहार

**(१५) * ९९७८० श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील वखार महामंडळाच्या धान्य गोदामामध्ये १० हजार क्विंटल धान्यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा गैरव्यवहार दडपण्यासाठी त्याची आकडेवारी कमी दाखविण्यात आली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी निरीक्षक पदाच्या निम्नश्रेणीच्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

परंतु, २६६० क्विंटल इतक्या धान्य् साठयाचा गैरव्यवहार झाल्याचे सकृत दर्शनी दिसून आले आहे. त्यामुळे याबाबत चौकशी करण्यासाठी तपासणी पथक

नेमून या पथकाच्या अहवालानुसार श्री. एम.टी.बुदिले माजी केंद्रप्रमुख यांच्या विरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन अकोला यांना दि.१४.१०.२०१७ रोजी पत्र लिहून एफ.आय.आर. दाखल करण्याचे महामंडळाने सांगितले आहे.
(४) विलंब झालेला नाही. कारवाई सुरु आहे.

-----------------

## मेहुणबारे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याबाबत

**(१६) * १०२५७८ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहुणबारे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथे नवीन १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने अद्यापही कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे परिसरात महावितरण कंपनीच्या ३३ के.व्ही. मेहुणबारे उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. सदर उपकेंद्रास १३२ के.व्ही. चाळीसगाव उपकेंद्रातून वीज पुरवठा करण्यात येतो. मेहुणबारे उपकेंद्राची स्थापित क्षमता १४१ एम.व्ही.ए.असून सदर उपकेंद्रावर ९५ मे.वॅ. उच्चतम भाराची नोंद आहे.

१३२ के. व्ही. चाळीसगाव उपकेंद्रात १३२/३३ के.व्ही.५० एम.व्ही.ए. चे अतिरिक्त रोहित्र महापारेषण कंपनी मार्फत उभारण्यात येत आहे व महावितरण कंपनीसाठी ३३ के.व्ही. चे दोन बे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यामुळे

चाळीसगाव तालुक्यातील विद्यमान व भविष्यातील संभाव्य वीज भाराची पूर्तता करण्यात येईल.

तसेच फेज-II मध्ये १३२ के.व्ही. चाळीसगाव उपकेंद्रात २० एम.व्ही.ए.आर क्षमतेची कपॅसिटर बँक उभारण्यात येणार असल्याने संबंधित भागातील वीजेच्या दाबात सुधारणा होणार आहे.

त्यामुळे सद्यस्थितीत मेहुणबारे येथे १३२ के.व्ही. उपकेंद्राची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील भूविकास बँकेच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेत समाविष्ट करण्याबाबत

**(१७) * १०२१४६ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील भूविकास बँकेच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान कर्जमाफी योजनेत समाविष्ट करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.सहकार मंत्री यांना दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) दिनांक १/४/२००९ व त्यानंतर पीक कर्ज व मध्यम मुदत शेती कर्ज घेतलेल्या ज्या शेतकऱ्यांचे कर्ज दिनांक ३०/०६/२०१६ पर्यंत थकीत झाले आहे, अशा शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ जाहीर केली आहे. केवळ राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, खाजगी

बँका, ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांनी विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत अथवा थेट घेतलेले व दिनांक ३१/७/२०१७ पर्यंत परतफेड न झालेले पीक / मध्यम मुदत शेती कर्ज व पुनर्गठीत/फेरपुनर्गठीत कर्ज या कर्जमाफी योजनेसाठी पात्र आहे. मा.लोकप्रतिनिधींना त्याप्रमाणे कळविण्यात येत आहे.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील ग्रामपंचायतीकडे औद्योगिक वसाहतीची प्रलंबित असलेली पाणी पट्टी वसूल करण्याबाबत

**(१८) * ९८४०७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील ग्रामपंचायतीकडे औद्योगिक वसाहतीची रूपये १२ कोटींची पाणी देयकांची रक्कम थकीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त थकीत पाणीपट्टी भरण्यासाठी पाणीदेयकांच्या थकीतदारांना नोटीसा देत असल्याचे उपअभियंता एमआयडीसी यांनी शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार थकीत देयकांची वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

उरण तालुक्यातील २८ ग्रामपंचायती- कडे माहे ऑगस्ट, २०१७ अखेर एकूण रुपये २०,२२,९६,०७७/- एवढी थकबाकी आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि ग्रामपंचायती कडील पाणी पट्टी थकबाकीबाबत दि. १७/०४/२००७ तसेच दि.२५/०४/२०१३ च्या पत्रान्वये सदरची थकबाकीची रक्कम ग्रामपंचायतींना शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेमधून महामंडळास वर्ग करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना कळविले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार पाणी देयकाच्या थकबाकीदारांना प्रत्येक महिन्याच्या देयका बरोबर थकबाकी विषयी उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या कार्यालयाकडून नोटीस देण्यात येते. महामंडळाकडून पाण्याची थकबाकी वसूल करणे ही नित्याची बाब आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुरुडपाडा व सातवीपाडा (ता.वसई, जि.पालघर) या गावांना जोडणारा पूल बांधण्याबाबत

**(१९) * ९८२०३ श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुरुडपाडा व सातवीपाडा (ता.वसई, जि.पालघर) या गावांना जोडणारा पूल बांधण्यासाठी अद्यापही मान्यता न मिळाल्याने येथील ५० विद्यार्थ्यांना व शेकडो गावकऱ्यांना नदी पोहून जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांना जोडणारा पूल गत अनेक वर्षांपासून बांधण्यात न आल्यामुळे येथील विद्यार्थी व नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पुलास मान्यता देऊन तातडीने पुलाचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.

दिनांक १४ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या वृत्तपत्रात या आशयाची बातमी प्रसिध्द झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर पुलाच्या कामास मार्च, २०१७ मध्ये आदिवासी उपयोजनेंतर्गत

मंजूरी प्राप्त असून सदर काम निविदा स्तरावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टाकरखेड भागिले (ता.देउळगांवराजा, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्याचा विजेच्या तारेला स्पर्श होऊन मृत्यू झाल्याबाबत

**(२०) * ९८६५३ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकरखेड भागिले (ता.देउळगांवराजा, जि.बुलढाणा) येथील शिवहरी गुलाबराव देशमुख (वय २५) हा तरुण शेतात पाणी देण्यास गेला असताना अचानक सुरु झालेल्या वीज पुरवठयामुळे विद्‌युत तारेला स्पर्श होऊन त्याचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात सुरु असलेल्या वीज भारनियमनामुळे वीज पुरवठा सुरु असल्याचा अंदाज येत नसल्याने अशा अनुचित घटना घडत असल्याने शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच संबधितास कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

सदरचा अपघात हा नदी पात्रात असलेल्या मोटर स्टार्टर बॉक्स व सबमर्सिबल ईलेक्ट्रिक पंप यांच्यामधील उघडया असलेल्या केबल जॉईटला स्पर्श होऊन दिनांक ०६.१०.२०१७ च्या रात्री घडला आहे.

(२) भारनियमनामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना नियोजित भारनियमनाचे वेळापत्रक ग्रामपंचायत कार्यालय, स्थानिक वर्तमानपत्रे व इतर उपलब्ध प्रसार माध्यमांचा उपयोग करुन अवगत करण्यासाठी बुलढाणा जिल्हयातील महावितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांना विद्‌युत निरीक्षक,

बुलढाणा यांनी त्यांचे दिनांक २१.११.२०१७ अन्वये कळविले आहे. विद्युत निरिक्षक यांनी केलेल्या चौकशी नुसार सदर अपघातास ग्राहक जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.

(३) मृत व्यक्तीचे वडील श्री.गुलाबराव देशमुख यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार नुकसान भरपाईबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे नुकसान भरपाई देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला व्यापाऱ्यांकडून हमीभाव मिळत नसल्याबाबत

**(२१) * ९५४०८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.आशिष देशमुख (काटोल), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.राहूल कुल**

**(दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अमरावती, सांगली, बुलढाणा, नाशिक, सोलापूर व सातारा या जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नसल्याचे निदर्शनास येत असून सोयाबीन, तूर, मूग, उदीड, कापूस व मका या धान्यांची खरेदी व्यापाऱ्यांकडून हमीभावापेक्षा अत्यंत कमी दराने होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी प्रक्रियेत ऑनलाईन नोंदणी, सातबाऱ्यावर पिक-पेऱ्याची नोंदणी इत्यादी जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना शासनाच्या खरेदी केंद्रावर शेतमाल देतांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात शासकीय हमी भाव केंद्रे स्थापन केली नसल्यामुळे व्यापाऱ्यांकडून शासनाने जाहिर केलेल्या हमीभावाचे उल्लंघन होत असून त्यांच्यावर स्थानिक प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उत्पादित शेतमालासाठी शेतमाल तारण योजना राबविण्याचे आदेश मा.पणन राज्यमंत्री यांनी राज्य कृषी पणन मंडळ व राज्य वखार महामंडळ प्रशासनास दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने जाहीर केलेले हमीभाव शेतकऱ्यांना मिळण्याबाबत तालुका स्तरावर हमीभाव केंद्रे स्थापन करुन खरेदी करतांना घालण्यात येणाऱ्या जाचक अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत तसेच हमीभाव न देणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

शासकीय खरेदी केंद्रावर FAQ दर्जाचा शेतमाल हमी दराने खरेदी

केला जातो. बाजार समित्यांमध्ये नॉन FAQ दर्जाच्या शेतमालाच्या खरेदीबाबत शासन परीपत्रक दिनांक १३/०२/२०१७ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

शासकीय खरेदी केंद्र FAQ दर्जाचा शेतमाल खरेदी करण्यासाठी सुरु करण्यात आली आहेत.

(४) होय.

(५) शासकीय खरेदी केंद्रावर हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करण्यात येत नाही. शासकीय खरेदी केंद्रावर FAQ दर्जाचा शेतमाल खरेदीसाठीच्या अटी व शर्ती नाफेडने निश्चित केल्या आहेत. उदा. शेतकऱ्यांचे ऑनलाईन रजीस्ट्रेशन,७/१२ उतारा,पीक पेरा व उत्पादन इत्यादी,बाजार समित्यांच्या आवारात विक्रीसाठी आलेला नॉन FAQ दर्जाचे शेतमाल खरेदी संबधी शासन परिपत्रक दि.१३/०२/२०१७ अन्वये कार्यवाही होते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या विद्युत पुरवठ्या संदर्भात असलेल्या समस्यांबाबत

**(२२) * ९७७४९ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात विद्युत मंडळामार्फत रोहित्रांचे नुकसान झाले वा फ्युज गेला तरी त्याचा खर्च शेतकऱ्यांकडून वसूल केला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या जिल्हयातील अकोले व संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी भारनियमन व वारंवार वीज पुरवठा खंडित होत असणे या समस्यांबाबत रस्ता रोको व ठिय्या आंदोलन केले असल्याचेही माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोर्चेकऱ्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे तसेच उक्त

समस्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार या समस्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर भागास होणारा वीज पुरवठा अखंडित ठेवण्याबाबत संबंधित मोर्चेकऱ्यांची प्रमुख मागणी होती. माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये कोळशाच्या तुटवडयामुळे अतिरिक्त भारनियमन करण्यात आले होते. परंतु तो प्रश्न मिटल्यानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे. तथापि सदर भागातील वीज पुरवठयामध्ये आणखी सुधारणा करण्याच्या दृष्टीने मौजे कुंभेफळ येथे पायाभूत आराखडा - २ अंतर्गत ३३/११ केव्ही नवीन उपकेंद्र मंजूर करण्यात आले असून जागा हस्तांतरित करुन सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील गावांना दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२३) * १०२६६९ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत येणाऱ्या गावातील विकास कामांना निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री यांचेकडे दिनांक १७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मागणीपत्रात नमूद कामांसाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(३) नसल्यास, उक्त प्रकरणी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) व (३) तथापि अनुसुचित जाती व नवबौध्द वस्ती विकास योजना ही जिल्हा योजनेचा भाग असल्याने जिल्हा नियोजन समितीने निश्चित केल्याप्रमाणे सदर योजनेस निधी उपलब्ध होत असतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील शिष्यवृत्ती वाटपात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२४) * १०३०७१ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील शिष्यवृत्ती वाटपात झालेल्या एकूण रु.६४ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने नेमलेल्या चौकशी समितीने माहे मे, २०११ व जुलै, २०१३ मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मुंबई यांच्याकडे आपला चौकशी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरहू समितीने चंद्रपूर जिल्ह्यातील सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांच्या कार्यालयातील शिष्यवृत्ती वाटपात रु.२४.६३ कोटी व भारत सरकार शिष्यवृत्तीमध्ये रु.१४ कोटी, अकोला जिल्ह्यातील सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांच्या कार्यालयात रु.६.२२ कोटी, बुलढाणा जिल्ह्यातील सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांच्या कार्यालयात रुपये ८.३६ कोटी इतक्या रकमेचा शिष्यवृत्ती वाटपात गैरव्यवहार झाल्याचे विशेष चौकशी पथकाने (एसआयटी) अहवालात नमूद केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालातील नमूद गैरव्यवहाराच्या प्रकरणांतील दोषींची शासनाने चौकशी केली आहे काय, त्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे, वर्धा जिल्ह्यातील सन २००५ ते २०१० या कालावधीतील शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व शिष्यवृत्ती वाटपातील अनियमिततेसंदर्भात तत्कालीन सहायक संचालक (वित्त व लेखा) व तत्कालीन उपसंचालक (लेखा) यांचा अहवाल आयुक्तालयाने माहे मे, २०११ व माहे जुलै, २०१४ मध्ये शासनास सादर केला.

(२) व (३) विशेष चौकशी पथकाच्या अहवालातील एकूण १७०४ संस्थाच्या लेखापरिक्षणाच्या अनुषंगाने विश्लेषण व पडताळणी करण्याची कार्यवाही आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत सुरु असून अनियमिततेच्या रक्कमेची वसूलपात्र रक्कम संबंधित संस्थेकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केज, अंबाजोगाई व बीड (जि.बीड) येथील ग्रामीण भागातील अनेक वीज रोहित्रे नादुरुस्त असल्याबाबत

**(२५) * ९८६५८ श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, अंबाजोगाई व बीड (जि.बीड) येथील ग्रामीण भागातील अनेक रोहित्रे गत ३ महिन्यांपासून नादुरुस्त असून विभागाकडे लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा लेखी निवेदन देऊन देखील याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त विभागातील ११ के.व्ही.चा वीज पुरवठा करणाऱ्या विद्युत तारा अनेक वर्षांपासून बदलल्या नसल्याने त्या अत्यंत जीर्ण झाल्या असल्याचे देखील या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जीर्ण झालेल्या विद्युत तारांमधून मोठ्या प्रमाणात वीज गळती होत असून वीज गळतीमुळे पूर्ण क्षमतेने वीज पुरवठा होत नसल्याने अनेक रोहित्र जळणे व इतर समस्या निर्माण झाल्याने शेतकरी व वीज ग्राहकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार

याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली तसेच नादुरुस्त रोहित्र व जीर्ण झालेल्या विद्युत तारा बदली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) बीड मंडळाअंतर्गत मागील ३ महिन्यात केज उपविभागात ९१ वितरण रोहित्र नादुरुस्त झाले होते यापैकी ३८ वितरण रोहित्र बदलण्यात आले आहेत. बीड ग्रामीण उपविभागात ८ वितरण रोहित्र नादुरुस्त झाले होते. यापैकी तीन वितरण रोहित्र बदलण्यात आले आहेत. अंबाजोगाई उपविभागात ७० वितरण रोहित्र नादुरस्त झाले होते. त्यापैकी ४८ वितरण रोहित्र बदलण्यात आले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) तांत्रिक दृष्टया, वीज गळतीमुळे रोहित्रे नादुरुस्त होत नसून रोहित्रावरील वाढीव भारामुळे रोहित्रे नादुरुस्त होतात. जीर्ण वाहिन्यांमुळे वीज गळती होत असल्याने ११ के.व्ही. जीर्ण वीज वाहिन्या बदलण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. वीज पुरवठयाबाबत निर्माण होणाऱ्या समस्यांचे महावितरण कंपनीच्या स्थानिक पातळीवर त्वरित निरसन केले जाते.
(४) नादुरुस्त झालेले वितरण रोहित्र उपलब्धतेनुसार बदलले जातात. सन २०१६-१७ मध्ये केज उपविभागात ११ के.व्ही च्या एकूण ७ कि.मी. व बीड ग्रामीण उपविभागात ११ के.व्ही.च्या एकूण १०.८० कि.मी. जीर्ण वाहिन्या बदलण्यात आल्या आहेत. उर्वरित ११ के.व्ही. च्या जीर्ण वीजवाहिन्या बदलण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाशिम येथील प्रशासकीय कार्यालयांवर लावण्यात आलेल्या पवनचक्यांच्या देखभाल व दुरुस्तीबाबत

**(२६) * १०१७८६ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम येथील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय तसेच इतरही प्रशासकीय कार्यालयांवर लावण्यात आलेल्या पवनचक्यांची देखभाल दुरुस्ती न झाल्याने त्या नादुरुस्त अवस्थेत असल्याचे माहे ऑगस्ट,

२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पवनचक्क्या उभारणी करण्यासाठी केलेला खर्च व्यर्थ ठरला असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार निकृष्ट दर्जाच्या पवनचक्क्या उभारणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली तसेच या पवनचक्क्यांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे महाऊर्जामार्फत पवन-सौर संकरित संयंत्र सन २००७ मध्ये आस्थापित करण्यात आली. परंतु त्याचा देखभाल दुरूस्तीचा कालावधी संपल्यानंतर दिनांक ११/११/२००९ रोजी आलेल्या वादळामुळे संयंत्राचे पाते तुटल्याने नादुरूस्त झाली. तसेच जिल्हा पोलिस अधीक्षक, वाशिम येथील कार्यालयावरील सन २०१३ मध्ये जिल्हा नियोजन योजने अंतर्गत आस्थापित करण्यात आलेले ९ पवनचक्की संयंत्रांपैकी दिनांक ५/५/२०१६ रोजी आलेल्या वादळामुळे ५ संयंत्रे नादुरूस्त झाली आहेत. सदर संयंत्र देखभाल दुरूस्तीसाठीचा हमी कालावधी संपला असल्याने उक्त संयंत्रे दुरूस्तीचे काम संबंधितांकडून योग्य अभिकरणामार्फत आवश्यक प्रक्रिया राबवून करण्यात येणार आहे. यास्तव, याबाबत शासनाने चौकशी करण्याचा वा कंत्राटदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यातील “महावितरण आपल्या दारी” योजनेंतर्गत शेतीपंपाच्या विद्युत पुरवठ्यासाठी पायाभूत सुविधा देणेबाबत

**(२७) * ९९४१२ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील “महावितरण आपल्या दारी” योजनेंतर्गत सन २०१० ते सन २०१३ या कालावधीत मागेल त्या शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी डिमांड ड्राफ्ट भरून कनेक्शन देण्यात आले परंतु आजतागायत सदर कनेक्शनसाठी पायाभुत

सुविधा उभारण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कनेक्शनसाठी एल टी लाईन व इतर पायाभूत सुविधांसाठी निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी माहे, जुलै २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर कामासाठी निधी मंजूर करून काम त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व सदर काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यात "महावितरण आपल्या दारी" या योजनेअंतर्गत केबलद्वारे विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या १,२९,६५४ कृषीपंपाना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता आवश्यक निधीची व्यवस्था करुन त्यामधून सदर कामे करण्याचे महावितरण कंपनीकडून प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वीज कंपन्यांतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना रोजंदारी पद्धत अथवा सम काम-सम दाम पद्धत लागू करण्याबाबत

**(२८) * १०२१२५ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या वीज कंपन्यात सुमारे ३२,००० बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगार गेल्या ८ ते १० वर्षांपासून कार्यरत असून कर्मचाऱ्यांना रोजंदारी पद्धत किंवा सम काम-सम दाम पद्धत लागू करण्याची मागणी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान महाराष्ट्र वीज कंत्राटी (बाह्यस्त्रोत) कामगार संघाने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.ऊर्जा मंत्री महोदयांच्या आदेशान्वये नेमलेल्या रानडे समिती व भाटीया समितीने याबाबत सादर केलेल्या अहवालावर देखील शासनाने

अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू समित्यांच्या अहवालानुसार आणि महाराष्ट्र वीज कंत्राटी (बाह्यस्त्रोत) कामगार संघाने केलेल्या मागणीनुसार कामगारांना रोजंदारी पद्धत किंवा सम काम-सम दाम पद्धत लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) रानडे समितीच्या अहवालातील काही शिफारशी इतर विभागाशी संबंधित असल्याने त्याबाबत त्यांचे अभिप्राय घेण्यात येत आहेत. कंत्राटी कामगारांच्या समान काम समान वेतनासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.पुणे) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२९) * १००४८५ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार तसेच अनियमितता झाल्याबाबत श्री.कैलास शंकरराव टाकळकर यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास तक्रार अर्ज केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी, विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था पुणे यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) व (३) होय, सदर प्रकरणी विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, पुणे यांनी चौकशी अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचेकडे सादर केला आहे. त्यानुसार खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्यावर विहित केलेल्या जबाबदारीचे योग्य प्रकारे निर्वहन न केल्याचे दिसून येत असल्याने व त्यामुळे बाजार समितीचे कामकाज योग्यरित्या पार पाडण्यात कसूर केल्याचे आढळून आले आहे. सबब बाजार समितीचे सचिव यांचेविरूध्द ठपका ठेवून त्यांची वार्षीक वेतनवाढ एक वर्षाकरीता रोखण्याची शिक्षा बजावण्यात आली आहे. तसेच यापुढे बाजार समितीचे कामकाजामध्ये प्रशासकीय व तांत्रिक स्वरूपाच्या अनियमितता होणार नाहीत याबाबत बाजार समितीचे सचिवांना समज देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत-नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) मार्गावर वीज वाहक तार बाजूला करताना तरुणाचा झालेला मृत्यु

**(३०) * ९६२०५ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत-नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) मार्गावर असलेल्या डिकसळच्या नाक्यावरील जय मल्हार हॉटेल जवळ पडलेली वीज वाहक तार बाजूला करीत असतांना नरेश गवळी हे मृत्यूमुखी पडल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार कंपनीच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई

केली तसेच मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या वारसास शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दि. ०३/०९/२०१७ रोजी श्री. नरेश मनोहर गवळी या तरुणाचा तुटलेल्या विद्युत भारीत तारेच्या संपर्कात आल्याने मृत्यू झाला.
(२) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, पेण कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. सदर प्राणांतिक अपघात कर्जत-नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) मार्गावरील डिकसळ रस्त्यावर तुटून विद्युत भारीत राहिलेल्या महावितरण कंपनीच्या लघुदाब वाहिनीच्या संपर्कात आल्याने विद्युत धक्का बसून झाला आहे.
(३) महावितरण कंपनीच्या कर्जत उपविभागास विद्युत निरीक्षक, पेण यांनी दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने संबंधीत सहाय्यक अभियंता यांना निलंबित केले असून त्यांच्या विरुध्द तसेच अन्य वरिष्ठ तंत्रज्ञ यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरु केली आहे. मृत व्यक्तीच्या वारसास महावितरण कंपनीकडून दिनांक २२.११.२०१७ रोजी रुपये ४ लाख इतकी नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे भेंडवडे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील उपकार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी केलेली अनियमितता

**(३१) * १०१००८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भेंडवडे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील उपकार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या कामकाजाची जिल्हा दक्षता समितीद्वारे चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता महावितरण, कोल्हापूर विभाग यांचेकडे दिनांक २६ नोव्हेंबर, २०१७ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांनी नियमबाह्य पद्धतीने वीज जोडणी देणे, मीटर देणे, विना मंजूरी जोडणी देण्याकरिता आर्थिक व्यवहार करणे अशा प्रकारच्या

अनियमितता केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवेदनातील नमूद तक्रारींची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे,
(२) व (३) उक्त निवेदनास अनुसरुन महावितरण कंपनीच्या विभागीय स्तरावर चौकशी केली असता श्री. डी. के. मोहिते, कनिष्ठ अभियंता यांच्याकडे २६ वीज मागणी प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित असल्याचे दिसून आले. चौकशीमध्ये ते दोषी आढळून आल्याने त्यांना दिनांक ३०.०६.२०१७ रोजी रु. ५१,०००/- इतकी दंडात्मक शिक्षा ठोठावण्यात आली. तसेच त्यांची कोल्हापूर जिल्हयाबाहेर व अन्य उप कार्यकारी अभियंता श्री.दंडवते यांची विभागाबाहेर बदली करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक व धुळे जिल्हयातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या मृत्यूंबाबत

**(३२) * ९५९८० श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये गेल्या १७ वर्षांत सुमारे २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच धुळे जिल्हयातील ३ आदिवासी आश्रमशाळांतील ९ ते १५ वर्षे वयोगटातील ३ आदिवासी विद्यार्थ्यांचा माहे ऑगस्ट, २०१७ या एकाच

महिन्यात मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आश्रमशाळांना शासनाकडून अनुदान मिळत असूनही विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी खर्च केल्याचे दर्शवून प्रत्यक्षात विद्यार्थ्यांवर तात्पुरते औषधोपचार करुन त्यांना पालकांच्या स्वाधीन केले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वारंवार होत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या मृत्यूंची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार मृत्यूस जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सन २००१-०२ ते २०१६-१७ या कालावधीत नाशिक जिल्हयातील शासकीय आश्रमशाळांमध्ये विविध कारणांनी १९८ विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्याची बाब आढळून आली आहे.
(२) धुळे जिल्हयात शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत माहे ऑगस्ट २०१७ मध्ये दोन विद्यार्थी मृत्युच्या घटना घडल्या असून एक घटना विद्यार्थी शाळा प्रशासनाच्या ताब्यात असतांना सर्प दंशाच्या कारणाने व दुसरी घटना विद्यार्थी पालकांच्या ताब्यात असतांना आजारपणाच्या कारणाने घडलेली आहे.
(३) शाळा प्रशासनाने आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवर औषधोपचार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसल्यास चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

(४) व (५) राज्यातील आदिवासी विकास विभागातंर्गत असलेल्या आश्रमशाळातील विद्यार्थी मृत्युंच्या कारणाचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.सुभाष सांळुखे यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली होती. सदर समितीने आपला अहवाल सादर केला असून सदर अहवालात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी १८ अल्पकालिन व ०९ दिर्घकालिन स्वरुपाच्या उपाययोजना सुचविल्या असुन त्यापैकी बहुतांश शिफ़ारशींची अंमलबजावणी सुरु केलेली आहे.

-----------------

## मंगरुळ चव्हाळा (ता.नांदगाव, जि.अमरावती) येथील वर्गखोल्यांच्या बांधकामात झालेल्या गैरकारभाराबाबत

**(३३) * ९६८४० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी फासेपारधी सुधार समिती, मंगरुळ चव्हाळा (ता.नांदगाव, जि.अमरावती) येथील १० वर्गखोल्यांच्या बांधकामात झालेली अनियमितता तसेच संस्था चालकांच्या गैरकारभाराची तातडीने चौकशी करण्याबाबत आदिवासी पारधी समाज संघटना यांनी मा.आदिवासी विकास मंत्री आणि सचिव, आदिवासी विकास विभाग यांना दिनांक ४ ऑक्टोंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने उक्त गैरकारभाराची चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी पारधी समाज संघटना, महाराष्ट्र, मु.हिंगलासपूर, पो.धानोरा फर्सी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे दि.०२.१०.२०१७ चे तक्रार निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत शासन पत्र दि.१२/१०/२०१७ अन्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांना कळविण्यात आले असून त्यांचेमार्फत चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## थेऊर (ता.हवेली, जि.पुणे) येथील उरूळी कांचन विभागातील

## गावांमध्ये वीजपुरवठा खंडीत होत असल्याबाबत

**(३४) * ९९०९५ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थेऊर (ता.हवेली, जि.पुणे) येथील वीज उपकेंद्रातून फिडरकडे जाणारी २२ के.व्ही. लाईन नादुरूस्त असल्याने उरूळी कांचन विभागातील गावांमध्ये वीजेच्या तारा तुटून वीजपुरवठा खंडीत होत असल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फिडरवरील वीजेच्या तारा जिर्ण झाल्या असून थेऊर ते उरूळी कांचन २० कि.मी. तसेच कोरेगाव मुळ ते येवत २२ कि.मी. अशा दोन २२ केव्ही एचटी लाईनचे प्रस्ताव मंजूर असून सुध्दा अद्यापही त्यांची उभारणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार उरूळी कांचन विभागातील वीज खंडित होण्याच्या समस्येबाबत व एचटी लाईनची उभारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) थेऊर ते उरुळीकांचन दरम्यान २० कि.मी. अंतराच्या २२ के.व्ही. वीज वाहिनीचे काम प्रगतीपथावर असून ते मार्च २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच कोरेगांव मुळ ते येवत दरम्यान २८ कि.मी. अंतराच्या नवीन ३३ के.व्ही. अतिरिक्त वीज वाहिनीच्या उभारणीचे काम देखील सध्या प्रगतीपथावर आहे.

परंतु कोरेगांव मुळ, भरतगांव व बोरी ऐंदी या गावातील स्थानिक शेतकऱ्यांनी पोल उभे करण्यास (RoW) हरकत घेतलेली आहे. त्याकरिता तिन्ही गावांचे सरपंच व उपअभियंता, जिल्हा परिषद, दौंड यांच्याशी संपर्क साधून अडथळा दूर करण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत प्रयत्न चालू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) येथील वाघोबानगर भागात विद्युत वाहिन्यांना स्पर्श झाल्याने दोन अल्पवयीन मुलींचा झालेला मृत्यू

**(३५) * १००८१३ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील वाघोबानगर भागात महावितरणचे डी.पी.बॉक्स उघडे असल्याने येथील विद्युत वाहिन्यांना दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास दोन अल्पवयीन मुलींचा स्पर्श झाल्याने विजेचा धक्का लागून त्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उघडे डी.पी.बॉक्स व लोंबकळत असलेल्या विद्युत वाहिन्या याकडे दुर्लक्ष करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचारी यांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीदरम्यान काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच मृत मुलींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदरची घटना महावितरण कंपनीच्या डी.पी. बॉक्सवर घडलेली नसून ठाणे महानगर पालिकेच्या पथदिव्याच्या खांबावरील जंक्शन बॉक्समधून अनधिकृतपणे जोडलेल्या सदोष वायरला स्पर्श झाल्याने वीजेचा धक्का बसून एका अल्पवयीन मुलीचा प्राणांतिक अपघात घडला आहे.

(२) व (३) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, ठाणे-१ यांच्या मार्फत करण्यात आली आहे. सदरचा अपघात ठाणे महानगरपालिकेच्या अखत्यारितील पथदिव्याच्या खांबावर झालेला असल्यामुळे ठाणे महानगरपालिकेकडून मृत मुलीच्या वडिलांना रु. ४ लाख दिनांक ०४.१०.२०१७ रोजी देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील आदिवासी वसतीगृहात भोजन ठेकेदारांना देयक

## अदा न केल्याने विद्यार्थ्यांना उपाशी ठेवल्याबाबत

**(३६) * ९८३७६ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील सेंट्रल किचनच्या माध्यमातून आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहात भोजन पुरविणाऱ्या ठेकेदारांना शासनाने देयक अदा न केल्यामुळे विद्यार्थ्यांना जेवण न देता उपाशी ठेवल्याचा प्रकार घडला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपाशी ठेवल्याने विद्यार्थ्यांनी येथील आदिवासी विकास भवन येथे भर पावसात आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार निधीची तरतूद करुन भोजन ठेकेदारांची देयके वेळेवर अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच विद्यार्थ्यांना उपाशी ठेवणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रकल्प कार्यालय, नाशिक अंतर्गत ई निविदा प्रक्रीयेद्वारे निवड झालेल्या भोजनठेकेदारांनी पुरवठा आदेशातील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याबाबत प्रकल्प अधिकारी, नाशिक यांना निवेदन देऊन दि.२०.०८.२०१७ पासून भोजन देण्यास असमर्थता दर्शविली होती. तथापि, सदर निवेदनामध्ये भोजन ठेक्याचे देयक देण्यास विलंब झाल्याबाबत उल्लेख नव्हता.

दरम्यान वसतीगृहातील विद्यार्थ्यांचे भोजनाची अडचण होऊ नये याकरिता प्रकल्प अधिकारी, नाशिक यांनी सेंट्रल किचन, मुंढेगाव येथून दि.२०.०८.२०१७ रोजी भोजन मागविले होते. तथापि, वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी भोजनठेकेदारांकडूनच आहार देण्याबाबत प्रकल्प अधिकारी यांना लेखी निवेदन दिल्याने दि.२१.०८.२०१७ पासून पुनश्च: भोजनठेकेदारांकडून भोजन पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

भोजनपुरवठाधारकांची माहे नोव्हेंबर, २०१७ पर्यंतची देयके अदा करण्यात

आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील उत्पादन शुल्क विभागातील विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत

**(३७) * १००४०१ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उत्पादन शुल्क विभागातील विविध संवर्गातील ७५० ते ८०० पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून अपुऱ्या मनुष्यबळामुळे प्रकरणे अंतिम कार्यवाहीसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच पुणे शहरातील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात कर्मचारी वर्ग कमी असून जागा रिक्त असल्याने नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होण्यास विलंब होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उत्पादन शुल्क विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
परंतु त्याचा कामकाजावर परिणाम होवू दिला जात नाही.
(२) होय, परंतु कामकाजाकरीता आवश्यक ते अधिकारी / कर्मचारी उपलब्ध आहेत. त्यामुळे कामकाजात विलंब होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) सन-२०१७ मध्ये ४० दुय्यम निरीक्षकांना निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत. तसेच लिपिक संवर्गातील २८ लिपिक-टंकलेखक यांना वरिष्ठ लिपिक पदावर व १९ वरिष्ठ लिपिक यांना कार्यालय अधीक्षक पदावर

पदोन्नत्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच सरळसेवेची जवान, चपराशी व लिपिक-टंकलेखक अशी एकूण २२ पदे अनुकंपाद्वारे भरण्यात आलेली आहेत. व माहे डिसेंबर-२०१७ अखेर अथवा जानेवारी-२०१८ च्या सुरुवातीला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून एकूण ३०० दुय्यम निरीक्षकांची पदे उपलब्ध होणार आहेत. अधीक्षक-१, उपअधीक्षक-५, सहाय्यक आयुक्त -१, यांची भरती करण्यात आली असून त्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. शासन धोरणानुसार सध्या केवळ ४% पदे सरळसेवेद्वारे भरण्यास परवानगी असल्याने त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. निरीक्षक पदावरील पदोन्नती प्रक्रिया कार्यवाहीत आहे. त्यामुळे विभागातील बहुतांशी पदे भरली जातील.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम वितरित न झाल्याबाबत

**(३८) * १००४७७ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील १२०० अपंग विद्यार्थ्यांच्या गत वर्षीच्या शिष्यवृत्तीसाठी वर्ग केलेली २८ लाख ३३ हजार रुपये इतकी रक्कम वितरित न झाल्यामुळे नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात विद्यार्थ्यांनी समाजकल्याण संचालक व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांचेकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रक्कम वितरित न होण्याची कारणे काय आहेत व पात्र अपंग विद्यार्थ्यांना उपरोक्त रक्कमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप कधीपर्यंत करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२), (३) व (४) प्रश्नाधिन शिष्यवृत्तीची रक्कम नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत वितरीत करण्यात येते. तथापि

उक्त बँकेचे धनादेश क्लिअरींग रिझर्व्ह बँकेकडून बंद करण्यात आल्याने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करता आली नाही.

शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खाती जमा करण्यासंदर्भात बँकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## पिंपळगाव (ब) (ता.निफाड, जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत टोमॅटो पिकासाठी अनधिकृतपणे तोलाई घेतल्याबाबत

**(३९) * १०१२८७ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव (ब) (ता.निफाड, जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत टोमॅटो पिकासाठी अनधिकृतपणे प्रती कॅरेट ५० पैसे तोलाई घेतल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पणन मंत्री यांना दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृतपणे तोलाई घेतल्याप्रकरणी संबंधित बाजार समितीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) या संदर्भात सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, निफाड जिल्हा नाशिक यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली असुन सदरची तोलाई बाजार समितीच्या उपविधीतील तरतुद व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांच्या परिपत्रकानुसार आकारण्यात येत आहे. त्यामुळे बाजार समिती विरूध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे खानापूर (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे महापारेषण कंपनीने घेतलेल्या जागेवर वीज प्रकल्प उभारणीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४०) * १०२५८९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खानापूर (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे महापारेषण कंपनीने ३ वर्षांपूर्वी ताब्यात घेतलेल्या जागेवर वीज प्रकल्प उभारणीचे काम अद्यापपर्यंत सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच बोरी, आणे, मंगळूर याठिकाणी ३३ के.व्ही. तसेच ओतूर येथे १३२/३३ के.व्ही. सबस्टेशन उभारणीच्या मागणीबाबत तसेच जुन्नर तालुक्यातील विविध ठिकाणच्या प्रलंबित समस्याबांबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, मौजे खानापूर मधील जागेवर प्रकल्प उभारण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनातील प्रलंबित समस्याबांबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) ओतूर परिसरात महावितरण कंपनीच्या ३३ के.व्ही. ओतूर उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो, ज्यास २२० के.व्ही. आळेफाटा उपकेंद्रातून वीज पुरवठा करण्यात येतो. आळेफाटा-ओतूर हे अंतर अंदाजे १४ ते १५ कि.मी. आहे. शिवाय २२० के.व्ही. आळेफाटा येथे १३२ के.व्ही. स्तरावर २ X ५ एम.व्ही.ए.आर. कपॅसिटर बँक त्याचप्रमाणे १३२ के.व्ही. नारायणगाव येथे २ X ५ एम.व्ही.ए.आर. कपॅसिटर बँक प्रस्तावित आहे. हे काम झाल्यानंतर परिसरातील ३३ के.व्ही. उपकेंद्रातील विद्युत दाबात लक्षणीय सुधारणा होणार आहे.

मौजे आणे येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र दिनदयाळ उपाध्याय योजनेमध्ये मंजूर झालेले असून त्याचे काम प्रगती पथावर आहे. मौजे उंब्रज येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रातील रोहित्राची क्षमतावाढ (५ एम.व्ही.ए.) पं. दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजने अंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेले आहे. यामुळे सद्यस्थितीत ओतूर, उंब्रज, पिंपरीपेंढार, कोळवाडी, नेतवड या ठिकाणी उपकेंद्राची आवश्यकता नाही.

आळेफाटा व नारायणगाव उपकेंद्रात क्षमता शिल्लक असल्याने तसेच

ओतूर व खानापूर याचे अंतर सदर उप केंद्रापासून कमी असल्याने सद्यस्थितीत दोन्ही ठिकाणी अतिउच्च दाब उपकेंद्राची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जवळाबाजार (जि.हिंगोली) परिसरातील सोयाबीन उत्पादकांना अनुदान न मिळाल्याबाबत

**(४१) * ९६९२३ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवळाबाजार (जि.हिंगोली) परिसरातील सोयाबीन उत्पादकांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानासाठी अर्ज केले असतानाही त्यांची माहिती संबंधित विभागाला बाजार समितीने योग्यरित्या सादर न केल्याने सुमारे ४ हजार ४० शेतकरी अनुदानापासून वंचित राहिल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सोयाबीन उत्पादकांना अनुदानापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच अनुदानासाठी अर्ज केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) जवळाबाजार बाजार समितीने सादर केलेल्या ४६०४ शेतकऱ्यांच्या प्रस्तावांपैकी ५५६ शेतकऱ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय छाननी समितीने शिफारस करुन सादर केलेले होते. सदर ५५६ शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

प्रस्तावासोबत योग्य कागदपत्रे नसल्याने बाजार समितीकडे परत केलेल्या ४०४८ प्रस्तावांपैकी २४१९ प्रस्ताव बाजार समितीने पुन्हा तालुकास्तरीय छाननी समितीमार्फत जिल्हास्तरीय समितीकडे पुढील योग्य कार्यवाहीस्तव सादर केलेले

आहेत. प्रस्तावातील सोयाबीनची खरेदी विक्री बाजार समितीच्या आवारात अथवा देखरेखीखाली झाल्याची कसलीही नोंद बाजार समितीच्या अभिलेख्यात आणि संबंधित खरेदीदार व्यापारी/आडत्याच्या अभिलेख्यात नसल्याने सोयाबीन अनुदानाचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात यावेत, असे अभिप्राय जिल्हास्तरीय समितीने नोंदविले आहेत.

जिल्हास्तरीय समितीच्या अभिप्रायासह अनुदान प्रस्ताव पणन संचालनालयाकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) क्षेत्रीय कार्यालयाकडून अनुदानाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, प्रस्तावाची योग्यता तपासून त्यावर निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोसे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांची बेकायदेशीर वीज देयके रद्द करण्याबाबत

**(४२) * १००४८२ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे पावसाअभावी तलावामध्ये पाणी नसल्याने या परिसरातील शेतकऱ्यांनी आपले वीज पंप ८ वर्षापूर्वीच काढले असूनही वीज वितरण कंपनी मात्र वीज देयके आकारत असल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बेकायदेशीर देयके रद्द करण्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी मागणी करुनही कंपनीने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली तसेच बेकायदेशीर देयके रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) भोसे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील तलावावर असलेल्या १२ शेती पंप ग्राहकांना जादा वीज देयकांची

आकारणी करण्यात आली होती. तथापि, महावितरण कंपनीमार्फत स्थळ पाहणी करुन ती देयके दुरुस्त करुन देण्यात आली. तसेच मीटर रिडींग चुकीची टाकल्यामुळे मीटर रिंडीग एजन्सीवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा शहरातील इंदिरा नगर या रहिवाशी वस्तीतील देशी दारूचे दुकान हटविण्याबाबत

**(४३) * ९५०९०  श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा शहरातील इंदिरा नगर या रहिवाशी वस्तीतील देशी दारूच्या दुकानामुळे येथील महिला व मुलांमध्ये दहशतीचे वातावरण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रहिवाशी वस्तीतील दारूचे दुकान हटविण्याबाबत महिला व सामाजिक कार्यकर्त्यांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास आमरण उपोषण करून जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार बुलढाणा शहरातील इंदिरा नगर या रहिवाशी वस्तीतील देशी दारूचे दुकान हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीत प्रस्तुत अनुज्ञप्ती नियमानुसार सुरु असल्याचे दिसून आले. नियमानुसार सुरु असलेली किंवा स्थलांतर झालेली अनुज्ञप्ती बंद करावयाची असल्यास त्याबाबत शासनाच्या दि.२५.३.२००८ व दि.१२.०२.२००९ रोजीच्या अधिसूचनेत विहित केल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत निवेदनकर्त्यांना अवगत करण्यात  आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेतील व्याज परताव्यापासून वंचित असल्याबाबत

**(४४) * १००२५०  श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेतील जवळजवळ दोन लाख शेतकरी गेले दोन वर्षापासून २७ कोटी ३२ लाखांच्या व्याज परताव्यापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांना तातडीने व्याज परतावा देण्यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशतः खरे आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत माहे ऑक्टोबर २०१७ अखेर त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणा, राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका व खाजगी बँकांकडील २०१५-१६ अखेरचे एकूण २ लाख २० हजार इतक्या लाभार्थी शेतकऱ्यांचे रूपये ३०.०० कोटी (रू.३००० लाख) इतक्या रक्कमेचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक कोल्हापूर यांच्याकडे प्राप्त झाले आहेत.

(२) या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक कोल्हापूर यांनी रूपये १९००.०० लाख इतक्या रक्कमेचे देयक जिल्हा कोषागाराकडे सादर केले आहे. सन २०१७-१८ या कालावधीसाठी जिल्हा उपनिबंधक, कोल्हापूर यांना रूपये ११००.०० लाख अनुदान मंजूर असून हा प्रस्तावही जिल्हा नियोजन समितीकडे पाठविलेला आहे.

दोन्ही प्रस्तावांमध्ये मिळून २ लाख २० हजार इतक्या लाभार्थी

शेतकऱ्यांचा समावेश आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ग्रामस्थांनी वीज वितरणासंदर्भात केलेल्या मागण्यांबाबत

**(४५) * ९७३८७ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांगनूरसह परिसरातील अरळगुंडी, कडलगे, इदरगुच्ची आणि खणदाळ (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील ग्रामस्थांनी वीज वितरण कंपनीच्या अकार्यक्षमतेच्या विरोधात दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांनी आपल्या मागण्यांचे निवेदन उपकार्यकारी अभियंता, नांगनूर, गडहिंग्लज यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे तसेच निवेदनातील मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) दि. ३१.०७.२०१७ रोजी नांगनूर परिसरातील ग्रामस्थांनी नवीन मीटर पुरवठा तात्काळ करण्यात यावा, कृषी क्षेत्रास भारनियमन रद्द करुन दिवसा वीज पुरवठा करण्यात यावा, शेती पंपाचे नादुरुस्त मिटर त्वरित बदलणे व बिलाची योग्य आकारणी करणे या मागण्यांकरिता मोर्चा काढला होता व त्यासंदर्भातील निवेदन त्यांनी संबंधित महावितरण उपविभागास दिले आहे.
(३) वीजेची मागणी व उपलब्धतेनुसार व महावितरणच्या दि. १५/०९/२०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार दि.१७/०९/२०१७ पासून दिवसा ८ तास व रात्री ८ तास चक्राकार पध्दतीने विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. चुकीच्या वीज देयकांच्या १९ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. महावितरण कंपनीच्या उपविभागीय स्तरावर सदर सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांच्या नावावर हजारो एकर जमिनी दर्शवून व्यापाऱ्यांनी शासनाची खरेदी केंद्रावर केलेली फसवणूक

**(४६) * १०१०५४ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांकडून कमी दरात माल घेऊन शासनाच्या खरेदी केंद्रांवर हमीभावात विकून व्यापाऱ्यांनी फायदा मिळविला असून शेतकऱ्यांच्या नावावर हजारो एकर जमिनी दर्शवून शासनाची फसवणूक केल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, वर्धा, सोलापूर, उस्मानाबाद, अहमदनगर, नांदेड, वाशीम या जिल्ह्यांतील अनेक शेतकऱ्यांच्या नावावर हजारोएकर जमिनी दाखविल्या असून व्यापाऱ्यांनी खरेदी केंद्राच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांशी संगनमत करून सदरहू गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील संबंधित व्यापाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) हे खरे नाही.

हंगाम २०१७-१८ मध्ये किमान आधारभूत किंमतीवरील मूग,उडीद व सोयाबीनची खरेदी नाफेडच्या निर्णयाप्रमाणे ऑनलाईन पदधतीने शेतकऱ्यांची नोंदणी करुनच करण्यात आली आहे. सुरुवातीला शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्याची माहिती भरत असतांना अनावधानाने जास्तीच्या क्षेत्राची नोंद झाली होती. सदरची बाब वर्तमानपत्रातुन व लोकप्रतिनिधींकडून निदर्शनास आणल्यानंतर NEML संस्थेकडे चौकशी केली असता अनावधानाने जास्तीच्या क्षेत्राची नोंद केल्याचे स्पष्ट झाल्यामुळे नंतर या चुकीची दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच ०२ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे आदिवासी विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांसाठी काढलेल्या मोर्चाबाबत

**(४७) * १०१८०६ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास योजनेतंर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना वस्तू खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना तसेच वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजना शासनाने सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुलभूत अधिकारापासून वंचित ठेवत असल्याने विदर्भातील हजारो विद्यार्थ्यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास नागपूर येथे मोर्चा काढला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या मागण्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यानुसार मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी आदिवासी विद्यार्थी संघ, विदर्भ, नागपूर यांनी दि.२५.०९.२०१७ रोजी मोर्चा काढला असल्याची बाब खरी आहे.

(३) सदर संघटनेने डी.बी.टी. योजना बंद करणे, वसतिगृह प्रवेश प्रक्रीया ऑफलाईन राबविणे, पंडीत दीनदयाल उपाध्याय योजना बंद करणे, पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीचे वाटप करणे, आश्रमशाळा / वसतीगृहातील विद्यार्थ्यांना विमा

योजना सुरू करणे, वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करणे, नवीन शासकीय वसतीगृहे बांधणे, जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करून बोगस आदिवासी विद्यार्थी प्रवेश रोखणे, पदोन्नतीमधील आरक्षण कायम ठेवणे इत्यादी मागण्या केलेल्या आहेत.

सदर मागण्यांच्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना दि.२८.११.२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासंदर्भात उपाययोजना करण्याबाबत

**(४८) * ९५४१५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे सर्पदंश, विषबाधा, लैंगिक शोषण इत्यादी कारणांमुळे सतत होणारे मृत्यू यावरील उपापयोजनांबाबत दिनांक ३० मे, २०१६ रोजी डॉ.साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने आपला अहवाल माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात १०७७ विद्यार्थ्यांचा विविध कारणांमुळे मृत्यू झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले असून आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे सर्वाधिक मृत्यू सर्पदंशाने झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्र पाठवून

याप्रकरणी तातडीने उपाययोजना करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासंदर्भात तसेच उक्त अहवालातील इतर शिफारशींवर कार्यवाही करुन आश्रमशाळांना आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) आदिवासी विकास विभागाने डॉ. सुभाष सांळुखे, सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३०.५.२०१६ अन्वये तांत्रिक समिती गठीत केली होती. या समितीने अभ्यास करुन आपला अहवाल दिनांक १९-१०-२०१६ रोजी मा.राज्यपाल महोदयांना सादर केला आहे. सदर समितीच्या अहवालानुसार सन २००१-२००२ ते २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात आश्रमशाळेतील १०७७ विद्यार्थ्यांचा विविध कारणांनी मृत्यू झाला असून त्यापैकी ११० मृत्यू सर्पदंश या कारणाने झाले आहेत. लैंगिक शोषणामुळे मृत्यु झाल्याची बाब अहवालात नमूद नाही.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) डॉ.सुभाष सांळुखे समितीने सादर केलेल्या अहवालात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी १८ अल्पकालिन व ०९ दिर्घकालिन स्वरुपाच्या उपाययोजना सुचविल्या असुन त्यापैकी बहुतांश शिफ़ारशींची तातडीने अंमलबजावणी सुरु केलेली आहे.

-----------------

## गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात कृषी पंपासाठी वीज जोडणी दिली जात नसल्याबाबत

**(४९) * १०२९५९ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी पंपासाठी तातडीने वीज जोडणी देण्याचे शासनाचे आदेश असतानाही गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात वीज जोडणी दिली जात नसून ६४५ पैकी ३९० रोहित्रांची कामे देखील ठेकेदारांच्या चुकीमुळे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याची उपलब्धता असतानाही वीज नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीला पाणी देता येत नसल्याने पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार येथील रोहित्रांची कामे तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच सदर कामात दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

गंगापूर तालुक्यात विदर्भ मराठवाडा कृषीपंप विद्युत जोडणी विशेष योजनेअंतर्गत ऑक्टोबर, २०१७ पर्यंत ९६७ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या असून प्रस्तावित ६४५ रोहित्रांपैकी ४९८ रोहित्रे कार्यान्वीत करण्यात आले आहे व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घारापुरी बेटावरील मोराबंदर, शेतबंदर आणि राजबंदर या गावांना वीज पुरवठा करण्याबाबत

**(५०) * १०२३२७ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घारापुरी बेटावरील मोराबंदर, शेतबंदर आणि राजबंदर या तीन गावातील ३५० कुटुंबासाठी महावितरणने विजेची यंत्रणा उभारण्याचे काम माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने मरिन केबल टाकून विजेचे खांब आणि विज वाहिन्या टाकण्याचे कामही पूर्ण केले आहे मात्र अद्यापही गावकऱ्यांना विज उपलब्ध झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त गावांना तातडीने वीजपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मरीन केबल समुद्रातून टाकण्याचे काम पूर्ण झाले असून केबल जॉईंटसच्या जागी केबल समुद्राच्या तळाशी नेण्याचे काम सुरु आहे. घारापुरी बेटावरील उच्चदाब केबल (मोरबंदर ते राजबंदर) टाकण्याच्या कामासाठी वनविभागाची परवानगी मिळाली नसल्यामुळे सदर काम अपूर्ण आहे. सदरची परवानगी मिळण्यासाठी महावितरण कंपनीकडून पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेंतर्गत अपंगाच्या (दिव्यांग) अनुदानित शाळांना अनुदान उपलब्ध न झाल्याबाबत

**(५१) * ९६६४० श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांच्या खात्यात निधी जमा करूनही ३५ अपंगाच्या (दिव्यांग) अनुदानित शाळेच्या २५०० विद्यार्थ्यांना अद्यापही सदरहू रक्कम मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्हयात मुकबधीर-१६, मतिमंद-१८, अस्थिव्यंग-६ व

अंध-५ अशा एकुण ३५ अनुदानित शाळेत २५०० विद्यार्थी शिकत असून उक्त शाळांना मागील दोन महीन्यांपासुन परिपोषण, वसतीगृहाच्या इमारतीचे भाडे, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे दर महिन्याचे वेतन व खर्चासाठी अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या समाज कल्याण विभागाने जिल्हा परिषदेच्या खात्यात निधी जमा केल्याचे पत्र पुणे येथील समाज कल्याण आयुक्तांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी अपंगांच्या शाळेच्या संचालकांना पाठविले होते परंतु अद्यापपर्यंत त्यांच्या खात्यात उक्त निधी वर्ग करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपंग (दिव्यांग) अनुदानित शाळेच्या खात्यात निधी जमा करण्यास विलंब करणाऱ्या नागपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील संबंधितांची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) नाही, नागपूर जिल्ह्यात दिव्यांगांच्या विविध प्रवर्गातील ४७ शाळा कार्यरत आहेत. त्यापैकी ४४ शाळांना नियमानुसार वेतन आणि वेतनेतर अनुदान वितरित करण्यात आले आहे. उर्वरित २ शाळांची अनुज्ञाप्ती रद्द करण्यात आल्याने आणि १ शाळेतील कर्मचाऱ्यांची नावे समाज सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्याची कार्यवाही प्रस्तावित असल्याने त्यांना अनुदान वितरित करण्यात आले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) येथील व्यापारी कापूस खरेदीत शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याबाबत

**(५२) * १०१६०४ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) येथे गत वर्षापासून व्यापाऱ्यांकडून कापूस खरेदी फारी काटयावर (मोठा ताण काटा) केली जात असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची लुट होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांनी संबंधित विभागाकडे तकार करुनही अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्याने शेतकरी संघटनेच्यावतीने आंदोलने करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) स्वाभिमानी शेतकरी संघटनेने देऊळगाव राजा कृषि उत्पन्न बाजार समितीकडे इलेक्ट्रीक काट्यावर मोजमाप करण्याची मागणीचे निवेदन सादर केले होते. निवेदनाच्या मागणीप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली असल्यामुळे कोणत्याही प्रकारचे आंदोलन झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती नवबौद्ध घटकांच्या वस्तीच्या विकासासाठीच्या अखर्चित निधीबाबत

**(५३) * १०२२८८ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूरअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे योजनेंतर्गत औसा व लातूर तालुक्यातील कामांसाठी मंजूर करण्यात आलेला सन २०१३-१४ मधील अखर्चित निधी, खर्च

करण्यास परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याबाबत मा.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांनी सहसचिव, सामाजिक न्याय विभाग यांना दिनांक १४ जुलै, २०१७ रोजी आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लातूर जिल्हा परिषदेतील सन २०१७ मधील अशा अखर्चित निधींच्या किती प्रस्तावांना शासनाने मान्यता दिली आहे,

(४) असल्यास, अखर्चित निधी खर्च करण्यास मान्यता मिळण्यासाठी प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व अखर्चित निधीच्या मान्यतेस किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) वित्त विभागाच्या दि. २१ सप्टेंबर २०१७ च्या शासन निर्णयास अनूसरून अखर्चित निधी खर्च करण्याबाबत सर्व समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांना या विभागामार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुदानित वसतिगृहांचे अनुदान व कर्मचारी मानधन देण्याबाबत

**(५४) * १०१२९८ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुदानित वसतिगृहांना देण्यात येणारे अनुदान व कर्मचारी मानधन मिळाले नसल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानित वसतिगृहांची मुळ मान्यता आदेशाच्या कारणांमुळे निर्माण झालेली आर्थिक अडचण दूर करण्यासाठी चर्चा करण्याकरिता मा.सामाजिक न्याय मंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावाच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी दिनांक ३० मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण विभाग (सर्व) यांना अनुदानित वसतिगृहांचे अनुदान १५ दिवसांत देण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित वसतिगृहांचे अनुदान व कर्मचारी मानधन देण्याबाबत मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ च्या पत्रान्वये सचिव यांना लेखी आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदानित वसतिगृहांचे अनुदान व कर्मचारी मानधन देण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय

(३) होय.

(४) विभागांतर्गत काही अनुदानित वसतीगृहांकडे मुळ मान्यता आदेश नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा वसतीगृहांची प्रादेशिक उप आयुक्त/उप आयुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्यामार्फत तपासणी करण्यात आलेली आहे.

यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आलेली असून, या समितीने मुळ मान्यता नसलेल्या वसतीगृहांची सुनावणी घेऊन अहवाल सादर केलेला आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

ज्या अनुदानित वसतिगृहांकडे मूळ मान्यता आदेश आहेत अशा वसतिगृहांचे अनुदान नियमानुसार अदा करण्यात आले आहे.

-----------------

## शिरोळ व राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यात शॉर्ट सर्किटमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत

**(५५) * १०२२९५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये चिंचवड (ता.शिरोळ) व तारळे खुर्द (ता.राधानगरी) येथे शॉर्ट सर्किट होऊन एकूण ६५ एकरातील ऊस पिकाचे पुर्णत: नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कौलव (ता.राधानगरी) येथे वीज तार तुटल्याने एका शेतकऱ्याचा मृत्यु झाल्याची बाब दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शॉर्टसर्कीटने आग लागून बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून त्यांना नुकसान भरपाई देणेबाबत व वीज तार तुटून मृत झालेल्या शेतकऱ्याच्या कुटूंबियांस आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदरचा अपघात दिनांक ०६.११.२०१७ रोजी झालेला आहे.

(३) सदर दोन जळीत व एक प्राणांतिक अपघातांची चौकशी विद्युत निरीक्षक, कोल्हापूर यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. सदर तिन्ही अपघात महावितरण कंपनीच्या सदोष संचमांडणीमुळे झाल्याचे निष्पन्न झाल्याने महावितरण कंपनीमार्फत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व प्राणांतिक अपघातग्रस्त

शेतकऱ्याच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई देण्याबाबत महावितरण कंपनीस विद्युत निरीक्षक, कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सरदार सरोवर प्रकल्पाद्वारे राज्याला २७% वीज न मिळाल्याबाबत

**(५६) * १०१९१५ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरदार सरोवर प्रकल्पातील एकूण वीज निर्मितीपैकी राज्याला २७% वीज मिळणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपावेतो राज्याला उपरोक्तप्रमाणे वीज न मिळाल्याने शासनाने नुकसान भरपाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रमाणे २७% वीज मिळण्याकरिता तसेच नुकसान भरपाईकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर मागणीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मागील तीन वर्षात सरदार सरोवर प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेपैकी २७ % वीज महावितरण कंपनीला प्राप्त झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोसरी (जि.पुणे) येथील संस्कार अर्बन को-ऑप. सोसायटी मध्ये गुंतवणूकदारांची झालेली फसवणूक

**(५७) * ९९१०० श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोसरी (जि.पुणे) येथील संस्कार अर्बन को-ऑप. सोसायटी मध्ये ३५ हजार

महिलांनी १८० कोटी रूपये गुंतवणूक केलेली असताना, सोसायटीच्या आर्थिक अडचणींमुळे या सर्व गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, (ता.शिरुर, जि.पुणे) येथील शिक्रापूर व सणसवाडी या दोनच गावांमधील बचत गटाच्या महिलांनी २ कोटी ५० लक्ष रूपये या सोसायटीत गुंतवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात गुंतवणूकदार महिलांनी पैशाची मागणी केली असता त्यांना कुठलीही रक्कम देण्यात आली नसून, उक्त प्रकरणी भोसरी पोलीस स्टेशनमध्ये अद्याप कुठलीही तक्रार नोंदवून घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच उक्त गुंतवणुकदारांना त्यांची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मात्र सदर पतसंस्थेतील एका ठेवीदाराने त्याच्या रु.१.२० लक्ष रक्कमेच्या ठेवी मिळत नसल्याबाबतची तक्रार दिनांक ३०.११.२०१७ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे कार्यालयास केली आहे.

(४) व (५) संबंधित ठेवीदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८९(१) नुसार सदर पतसंस्थेची तपासणी करण्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (६) यांची दिनांक २.१२.२०१७ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती केली आहे.

त्यानुसार उपरोक्त आदेशामध्ये नमूद मुद्यांच्या अनुषंगाने संस्थेची तपासणी सुरु आहे.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या थ्रि-फेज मिटरचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(५८) * ९६५४१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात विशेषत: बुलढाणा जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या थ्रि-फेज मिटरचा तुटवडा निर्माण झाला असल्याने विद्युत जोडणीचे अर्ज प्रलंबित असल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक व कृषी अशा विविध श्रेणीतील हजारो ग्राहकांनी विद्युत मिटरसाठी मागणी करुन देखील त्यांची विद्युत जोडणी मिटरच्या तुटवडयामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, त्यानुसार प्रलंबित असलेल्या हजारो ग्राहकांना विद्युत मिटरसह विद्युत जोडणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) बुलढाणा जिल्हयात १२.१०.२०१७ अखेर विविध वर्गवारीचे १३,७८८ ग्राहक पैसे भरुन वीज जोडणी करिता प्रलंबित होते. त्यापैकी मागील दोन महिन्यात मीटर उपलब्धतेनुसार एकूण ५१५३ वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत ३३७९ मीटर्स बुलढाणा मंडळातंर्गत उपलब्ध असून ६००० सिंगल फेज मीटर्स देण्याबाबत पुरवठादारास आदेश देण्यात आले आहेत. मीटर उपलब्धतेनुसार वीज जोडणी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना दिलेल्या भूखंडावरील बांधकामाबाबत

**(५९) * १०१२९९ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या भूसंपादनामुळे अनेक शेतकरी भूमिहीन झाले असून त्यामध्ये शेतकऱ्यांच्या राहत्या घरांचा समावेश असल्याने त्या बदल्यात पर्यायी जागा म्हणून निवासी भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूसंपादनामुळे शेतकऱ्यांना उदरनिर्वाहाचे कुठलेच साधन उपलब्ध नसल्यामुळे उदरनिर्वाहासाठी शेतकरी निवासी बांधकामामध्ये छोट्या स्वरुपाचे व्यवसाय करीत असल्याने सदरहू व्यवसाय अनधिकृत ठरवून शेतकऱ्यांना नोटीसा पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहासाठी निवासी भूखंडावर बांधकामासाठी १ ऐवजी वाढीव २ "एफएसआय" देण्यात यावा, त्या जागेमध्ये ३३% बांधकाम निवासी व व्यावसायिक (मिश्रित स्वरूपाचे) करण्यास मान्यता देण्यात यावी तसेच निवासी भूखंडाची ९ मीटर उंचीची अट रद्द करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीसंदर्भात शासनस्तरावर दिनांक १४/९/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत भूखंडधारकांच्या मागण्यासंदर्भात त्यांचेवर अन्याय होणार नाही याबाबत दक्षता घेऊन सहानुभूतीपूर्वक निर्णय घेण्यात येईल असे ठरविण्यात आले. त्यानुसार रहिवास व वाणिज्य वापराकरीता Basic १ .०० F.S.I. व प्रिमीयम भरून ०.५ F.S.I. मंजूर करण्यात येतो. अशा प्रकारे १.५० पर्यंत F.S.I.मंजूरीची तरतूद आहे.PAP भूखंडधारकांकरीता असलेली ७.०० मी. उंचीची मर्यादा बदलून १० मी. पर्यंत करण्यात आलेली आहे. तसेच निवासी भूखंडामध्ये वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्याकरीता महामंडळाच्या सुधारित विकास नियंत्रण नियमावली

दि.२४/९/२००९ पासून लागू झालेल्या वि.नि. नि.-२००९ मध्ये Mix Land Use तरतुद नसल्यामुळे Residencial व Commercial असा वापर एकाच भूखंडावर अनुज्ञेय करण्याच्या प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून सूचना व हरकती मागविण्यासाठी वृत्तपत्र व महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ७/११/२०१७ रोजी नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. येणाऱ्या सुचना व हरकतींवर सुनावणी देऊन प्रस्ताव नगरविकास विभागास सादर करण्याचे प्रस्तावित आहे. नगर विकास विभागाच्या मान्यतेनंतर मंजूरीची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील लोकसेवा सहकारी बँकेच्या पाषाण व चंदननगर येथील शाखांचे कामकाज सुरु करण्याबाबत

**(६०) * ९९११७ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील लोकसेवा सहकारी बँकेच्या पाषाण व चंदननगर येथील दोन्ही शाखांचे कामकाज बँक आर्थिक अडचणीत आल्यामुळे दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास बंद करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसेवा सहकारी बँकेच्या तत्कालीन संचालक मंडळाने विनातारण दिलेल्या कर्जामुळे बँक अडचणीत आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या बँकेमध्ये ८८ पतसंस्थांचे १२० कोटी रूपये अडकले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बँकेच्या तत्कालीन संचालक मंडळाने विनातारण कर्ज दिल्याप्रकरणी त्यांचेवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(५) तसेच दोन्ही शाखांचे कामकाज सुरु करण्याबाबत व गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

लोकसेवा सहकारी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष व मुख्य कार्यकरी अध्यक्ष यांनी विनातारण दिलेल्या कर्जांमुळे बँक अडचणीत आली असून दिनांक १९.९.२०१७ पासून सदर बँकेवर अवसायकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर बँकेमध्ये ८८ पतसंस्थांच्या एकूण १२० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत.

(४) बँकेचे तत्कालीन अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ नुसार चौकशी होऊन त्यांचेवर एकूण रु.५०.५६ कोटी इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे १६.७३ कोटी रक्कमेची वसूली करण्यात आलेली आहे.

बँकेचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे विरुद्ध समर्थ पोलिस स्टेशन, पुणे येथे दिनांक ३.३.२०१७ रोजी फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे.

(५) सद्यस्थितीत पाषाण व चंदननगर या दोन्ही शाखांचे कामकाज बँकेच्या मंगळवार पेठेतील मुख्य शाखेतून करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत डी.आय.सी.जी.सी. यांनी विहीत केलेल्या नमुन्यातील बँकेच्या ठेवीदारांची यादी तयार करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील विद्यार्थी निधीअभावी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(६१) * ९५९५१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी ३ कोटी रूपयांची मागणी असतांनाही शासनाने केवळ ३३ लाख रूपये शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिल्याने ११ हजार विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील प्राथमिक शाळांतील मुलींसाठी असलेल्या

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीकरिता देखील ७ हजार विद्यार्थीनी प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने निधीची तरतूद करून उक्त शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) माहे एप्रिल, २०१७ पासून महा-ईस्कॉल हे पोर्टल बंद असल्याने सदर विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती निकाली काढता आली नाही. दिनांक २१.११.२०१७ पासून महा-ईस्कॉल हे बंद असलेले पोर्टल सुरु करण्यात आले आहे. त्याद्वारे पात्र विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती निकाली काढण्याची कार्यवाही सुरु असुन, यासाठी सन २०१७-१८ मध्ये आवश्यक तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.